अतितात्काळ /पूरक मागण्या प्राथम्य

**सन २०२६-२७ मधील खर्चाच्या पूरक मागण्या**
**जून, २०२६ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्र.पूरक-२०२६/प्र.क्र.४७/अर्थ-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
**दिनांक:- २२ मे, २०२६.**

**संदर्भ** :- १.सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.०२/कार्या.र.व का १, दि. १२ जुलै, २०२४.
२. समक्रमांकाचे दि. १९ मे, २०२६ रोजीचे शासन परिपत्रक.

**परिपत्रक :-**

विधानमंडळाच्या **जून, २०२६** च्या अधिवेशनात चालू वित्तीय वर्षाच्या खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करावयाच्या सूचना संदर्भाधिन क्र. २ च्या शासन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. संदर्भाधिन क्र. १ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन प्रशासकीय विभागांमध्ये ई-ऑफिस कार्यप्रणालीचा प्रभावीपणे वापर करण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदरची बाब विचारात घेता सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

(अ) जून, २०२६ (पावसाळी) अधिवेशनासाठीची पूरक मागणीची नस्ती भौतिक स्वरुपात (Physical File) सादर न करता ई-ऑफिस प्रणालीव्दारेच वित्त विभागास दि. २६ मे, २०२६ पर्यंत सादर करावी.

(ब) सदरची नस्ती सादर करताना संदर्भाधिन क्र. २ च्या शासन परिपत्रकातील **परिशिष्ट "अ"** मध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्वसाधारण सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

(क) संदर्भाधिन क्र. २ च्या शासन परिपत्रकातील **"ब", "क" व "ड"** ही परिशिष्टे पूरक मागणीच्या नस्तीवर स्वतंत्रपणे सादर न करता त्यांचा पूरक मागणीच्या टिप्पणीमध्येच समावेश करावा.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले असून त्याचा संकेतांक २०२६०५२२११५१०१७६०५ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIVEK RAMBHAJI DAHIPHALE

Digitally signed by VIVEK RAMBHAJI DAHIPHALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, 2.5.4.20=56142975484e58364afe88f5f0e3138e3ce0d4e4058e42f003dfd69500064afb, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3981A50612646983D580DEA2DA5FB52A33D8E6E3C4F34CD80F08C598711CEB65, cn=VIVEK RAMBHAJI DAHIPHALE
Date: 2026.05.22 11:51:53 +05'30'

**( वि.रं. दहिफळे )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
२) मा.राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मलबार हिल, मुंबई,

३) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) प्रधान सचिव/सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई,
५) सह सचिव / उप सचिव (अर्थसंकल्प), सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
६) सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
७) सर्व मा.मंत्री व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८) अपर मुख्य सचिव (वित्त), अपर मुख्य सचिव (वि.सु.) प्रधान सचिव (व्यय), प्रधान सचिव (ले. व को.), वित्त विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक / स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
९) कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प-२/४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०) निवड नस्ती, अर्थ-३, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.